(89)

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2021 ◑ BF 881679

- 5 OCT 2021

अनु. क्र. ..... दि. ..... मु.शु.रक्कम ..... 500

दस्ताचा प्रकार ..... .....

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय / नाही ..... .....

मिळकतीचे वर्णन ..... .....

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव ..... .....

पत्ता ..... .....

दुसऱ्या पक्षकाराचे नांव ..... P.M.R.D.A.

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता ..... .....

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

सौ. आश्विनी डी. पोटफोडे
परवाना क्र. २२०११३३
६५८/ए, डेक्कन जिमखाना
पुणे ४११००४

वरिष्ठ कोषागार अधिकारी
सत्यमेव जयते
पुणे

29 SEP 2021

प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे करिता

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

NOTARY
MAHENDRA ARVIND NANG...
DIST. PUNE (MA...)
Regn. No. 1543...
Exp. Dt. 09/10/2024
GOVERNMENT OF IN...

इंडेम्निटी बॉंड

# हमीपत्र

हमीपत्र आज दिनांक ०५/ १०/२०२१ इसवी ते दिवशी मी/ आम्ही, इंटॉक्स प्रा .लि तर्फे संचालक १. डॉ प्रभाकर य. नाईक २.डॉ. मुकुल प्र. पोरे. ३.डॉ. नरेंद्र स. देशमुख रा .न्यू अजंठा अवेन्यू .पौड रोड,कोथरूड,पुणे. ४११०३८. वय : सज्ञान,धंदा : व्यवसाय, हमीपत्र लिहून देतो कि, मौजे उरावडे ता. मुळशी, जि.पुणे येथील गट नं.३७३(पै),३७५(पै),३७६(पै), यांसी एकूण क्षेत्र ९५७४.०० चौ.मी. या मिळकतीमध्ये निवासी/ बिगर निवासी पध्दतीचा प्लॉट बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक/ कुलमुखत्यारपत्रधारक म्हणून मी/आम्ही दाखल केला आहे.तुर्त या जागी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत कडून पूरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरिल बोअरद्वारा पाणी उपलब्ध करुन देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहे. व त्यासंबंधी आवश्याक त्या वरिष्ठ अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास योजना(G.W.S. & D.A) या कार्यालयामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देण्याची जबाबदारी आमचेवर बंधकारक राहील.

2) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतींमधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी पूणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत पिण्यासाठी पूरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करु शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाशांना मी/आम्ही करुन देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी/ आम्ही या हमीपत्राद्वारे स्विकरत आहे.

3) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपूरा झाल्यास मी/ आम्ही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

4) निवासी अगर व्यापारी गाळ्याचे विक्रिचे बुकिंग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणुन नमूद करण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परीस्थितीची जाणीवव करुन दिल्यानंतर या ठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर नियोजीत गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत चा पाणीपुरवठा सुरु होइपर्यंत आमच्या खर्चाने पाणीपुरवठा करुन देण्याची जबाबदारी आमची राहील. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत ला तोशीष लागू देणार नाही.

5) टँकरद्वारा किंवा बोअरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने प्रयोगशळेतुन तपासुन आणने व त्या रीपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात यईल याची काळजी मी/आम्ही घेऊ.

6) सदरची योजना संपुर्णरीत्या प्रवर्तक/मालक या नात्याने मी / आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नविन मालक/प्रवर्तक या हमिपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देइन त्यांचा समावेश नविन करारनाम्यात करण्यात यईल याची काळजी घेईन / घेऊ.

7) हे हमिपत्र माझे / आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

8) सदर प्लॉट्मधील संदर्भतील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमिपत्रचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणुन समजण्यात येईल.

पुणे..







लिहुन देणार
इंटॉक्स प्रा .लि तर्फे संचालक

१.डॉ प्रभाकर य नाईक .

२.डॉ. मुकुल प्र. पोरे

३.डॉ. नरेंद्र स. देशमुख

NOTED AND REGISTERED
AT SR. NO. 766/2021
DATE 05/10/2021

BEFORE ME

MAHENDRA ARVIND NANGARE
NOTARY, GOVT. OF INDIA
PUNE DIST. MAHARASHTRA
Regd No 15432 Exp Dt.09/10/2024

05 OCT 2021